लोकमत

# व्यक्तीचा गौरव म्हणजे समाजासाठी केलेल्या कामाचा गौरव

## वुमेन ग्रॅज्युएट्स युनियनच्या गौरव सोहळ्यात रूपाली चाकणकर यांचे प्रतिपादन




वुमेन ग्रॅज्युएट्स युनियनच्या पुरस्कार सोहळ्यात (डावीकडून) प्रोग्राम अँड फंड रायझिंग कमिटीच्या अध्यक्षा परवीन वनवारी, ट्रस्टी हवोवी गांधी, वुमेन ग्रॅज्युएट्स युनियनच्या अध्यक्षा ॲड. गौरी छाब्रिया, महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर, ट्रस्टी कश्मिरा मेहर होमजी, ट्रस्टी शीला शास्त्री, योगा थेरपिस्ट बिमल, ऑल स्टार्सच्या डिजिटलच्या प्रतिनिधी निधी, गव्हर्नमेंट लॉ कॉलेजच्या प्रिन्सिपल अस्मिता वैद्य, मणिबेन नानावटी वुमेन्स कॉलेजच्या प्रिन्सिपल राजेश्री त्रिवेदी, लायन्स क्लब ऑफ बॉम्बेच्या (क्वीन्सवे) रोशन मास्टर्स आणि मुकुल माधव फाउंडेशनच्या यास्मिन. (छाया : दत्ता खेडेकर)

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** व्यक्तीचा गौरव म्हणजे त्याने समाजासाठी केलेल्या कामाचा गौरव होय, त्यामुळे समाजाला देणे लाभलेल्या पुरस्कारार्थींचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे, असे गौरवोद्गार महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी वूमेन ग्रॅज्युएट्स युनियनच्या गौरव सोहळ्यात काढले.

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत वूमेन ग्रॅज्युएट्स युनियन प्रोग्राम अँड फंड रायझिंग कमिटीतर्फे कुलाबा येथील रुस्तमजी हॉलमध्ये आयोजित कार्यक्रमात लायन्स क्लब ऑफ बॉम्बे (क्वीन्सवे), मुकुल माधव फाउंडेशन, मणिबेन नानावटी वूमेन्स कॉलेजच्या प्रिन्सिपल राजेश्री त्रिवेदी, बैजल सुनील दोशी, गव्हर्नमेंट लॉ कॉलेजच्या प्रिन्सिपल अस्मिता वैद्य, लोकमत मीडियाचे चेअरमन डॉ. विजय दर्डा आणि ऑल स्टार्स डिजिटलच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रिद्धी छाब्रिया - असरानी यांच्या उल्लेखनीय कामगिरीचा गौरव करण्यात आला. या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून रुपाली चाकणकर उपस्थित होत्या. तर महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या सदस्या आणि वूमेन ग्रॅज्युएट्स युनियनच्या अध्यक्षा ॲड. गौरी छाब्रिया यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

> अभिनेत्री सिमरन अहुजा आमची ब्रँड ॲम्बेसिडर असून, आम्ही महिला सक्षमीकरणासाठी काम करत आहोत. लहान मुलांना शिक्षण उपलब्ध व्हावे, म्हणून बालवाडी सुरू करण्यात आली.
>
> **- ॲड. गौरी छाब्रिया,** अध्यक्ष, वूमेन ग्रॅज्युएट्स युनियन